# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- ३२३९/२०२१

अपिलार्थी, श्री.इब्राहिम अन्सारी
सोनू टेलर्स, शॉप नं.२,निअर सोना अपार्टमेंट,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१.००२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, सामान्य प्रशासन विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०८.०४.२०२४

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०९.२०२१ | -- | ११.१०.२०२१ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १६.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *"माहिती दिली नाही. माहिती देण्यास टाळाटाळ करित आहेत.* "असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" महानगर पालिका के कर्मचारी श्री.अजित गोवारी, प्रभाग क्र.३ में इस वॉर्ड ऑफिसर के रुप में काम कर रहे है, उसके बारे में जानकारी देने बाबत.*

*१) सन २०१५ से अभी तक कितनी बार बदली किया गया और क्या कारण से बदली किया गया।*

*२) कौन से सन में महानगर पालिका में नौकरी जॉईन किया गया है।*

*३) महानगरपालिका में.नोकरी जॉईन किया तो कौन सा पद था।*

*४) पहले कितना पगार थ और अब कितना पगार मिल रहा है।"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये *" माहिती प्राप्त झालेली नाही* "असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागीतलेली माहिती त्यांना विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपिल दाखल केले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन, आदेश पारित केले नाही. यास्तव त्यांनी द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना नोटीस प्राप्त होऊनदेखील ते सुनावणीस अनुपस्थित आहेत. तसेच त्यांनी त्यांचा लेखी अहवाल देखील आयोगासमोर सादर केले

नाही. त्यामुळे त्यांना एक संधी देऊन, सदर सुनावणी पुन्हा घेण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य राहील. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.०६.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ एप्रिल, २०२४ .